ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर पुणे.
ग्रामनिधी (एकत्रित) लेखापरीक्षण अहवाल सन 2019-2020.

---

जा.क्र. स्था./4ब/ग्रापं.ले.प. अहवाल/पुणे-173

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, लेखा कोष भवन,
3 रा मजला, पुणे- 1.
दिनांक - 20 / 07 / 21

प्रति,

मा. सरपंच,
ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर
जिल्हा पुणे.

महोदय,

ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर जिल्हा पुणे येथील सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे विविध निधीचे लेखापरीक्षण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 140(1) नुसार व मुंबई ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 17 व 18, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण/1008/ प्र.क्र. स्था18/ब/ग्रापलेप/आढावा/एए-2/1007 दि. 19/07/2007 अन्वये श्रीम .हर्षला [redacted]. खारकर ,कनिष्ठ लेखा परीक्षक ,स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांनी दि. 16/04/2021 ते दि 19/04/2021 या कालावधीत पुर्ण केले आहे.

**लेखापरीक्षण कालावधीत खालील व्यक्तींनी सरपंच व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी या पदाचा कार्यभार सांभाळला आहे.**

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | सौ. शोभा अशोक गोसावी | सरपंच | 01/04/2019 ते 31/03/2020 |
| 2 | श्री.डी.आर.सुरवसे | ग्रामसेवक | 01/04/2019 ते 31/03/2020 |



Scanned with CamScanner

## भाग- 1 ला (मागील लेखापरीक्षण)

ग्रामपंचायतीचे मागील लेखापरीक्षण सन 2018-2019 अखेर करणेत आलेले आहे. ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप पुर्तता स्विकृतीचे अधिकार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम 140 (2) अन्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असल्याने ही अद्यावत माहिती लेखापरीक्षकांकडे उपलब्ध नाही. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम 140 (3) व (4) अन्वये कार्यवाही झालेली नाही व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम 140 (5) अन्वये अंतिम निकाल प्रत ग्रामपंचायतीस प्राप्त झालेली नाही. नियमबाह्यतेबाबत खुलासा करुन पुर्तता सत्वर करावी. अद्याप पर्यंत पुर्तता न झालेल्या आक्षेपांची यादी पुढीलप्रमाणे आहे. त्याची पुर्तता करावी.

| अ. क्र. | लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित आक्षेप | स्विकृत आक्षेप | मान्यता देणारे अधिकारी | थकित परिच्छेद |
|---|---|---|---|---|---|
| | 2018-2019 | मागील ले.प. अहवाल उपलब्ध झालेला नाही | | | |

## भाग दोन

## चालु लेखापरीक्षण

### प्रस्ताविक

हा लेखापरीक्षण अहवाल ग्रामपंचापतीच्या ग्रामनिधी व वर नमुद केलेल्या विविध योजनांमधील आर्थिक व्यवहाराच्या तपासणी अंती तयार करण्यात आला आहे. त्यात ग्रामनिधी, सं.ग्रा.रो.यो. यांचे विभागवार आक्षेप तीन भागात केले आहेत. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|
| अ | कायद्याविरुध्द करण्यात आलेले प्रदान | 2 - 3 |
| ब | कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किवा गैरवर्तणूकीमुळे झालेली तूटीची किंवा नुकसानीची रक्कम | 4-15 |
| क | लेख्यामध्ये दर्शविणे आवश्यक असलेली परंतु न दर्शविलेली रक्कम | निरंक |
| ड | वरील (अ) (ब) (क) व्यतिरिक्त लेख्यांत आढळून आलेल्या महत्त्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी. | 16 - 25 |
| इ | लेखापरीक्षकास आवश्यक वाटत असलेला महत्वाचा परिच्छेद | ------- |



Scanned with CamScanner

ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचे निदर्शनास येते. ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता खालील उपाययोजना सूचविण्यात येत आहेत :

**नियम व सुचनांचे पालन करावे.**

अ) ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 38, 45, 52 ची कर्तव्ये योग्यरितीने पार पाडण्यासाठी खालील बाबींचा अवलंब केल्यास पंचायतीच्या उत्पन्नात वाढ करता येईल.

आवश्यक त्या सर्व प्रचलित करांचा अवलंब कमाल दराने करून कराची 100% वसुली करावी.

ब) खर्चात काटकसर करण्याची दक्षता घ्यावी.

क) तरतुदीचे अधीन राहूनच खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

ड) कराची थकबाकी वसुलात आणून पुर्तता करावी.

इ) ग्रामपंचायतीच्या भांडवली खर्चात कपात करून तसेच वसुलीचे प्रमाण वाढवुन ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुधारणेचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

ई) नमुना नं. 20 परिपूर्ण नाही. ब-याच रकमांची वसुली समायोजन होणे बाकी आहे. किरकोळ मागणी नोंदवही नमुना नं. 11 यामध्ये व्यवसाय कर, अनुदाने, लिलाव, जागा भाडे इत्यादी बाबीपासून येणे रकमांची मागणी करावी.

फ) कलम 124, 124(अ), 125, 126 नुसार ग्रामपंचायत हद्दीतील उद्योगधंदे, व्यवसाय, घरे इत्यादीवर कराची आकारणी करण्यात यावी.

**क) ग्रामपंचायतीचे मासिक / वार्षिक लेखे:**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं.1 ते 8 मध्ये लेखे ठेवणेबाबत.**

ग्रामपंचायतीने सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात लेखे तपासले असता भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं.1 ते 8 मध्ये लेखे ठेवणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय.

1) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं. 1 ते 8 मध्ये लेखे ठेवणे करीता महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.एम.ए.एस.-2013/प्र.क्र.14/वित्त-6 दि. 05/10/2013 नुसार सन 2013-2014 पासून अनिवार्य केले असून, त्याप्रमाणे लेखे ठेवलेले नाहीत.

2) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे पत्र क्र.सुविले-2013/प्र.क्र. 9/वित्त-6 दि. 03 जुन 2013 अन्वये सन 2013-2014 या आर्थिक वर्षापासून लेखे ठेवण्याची जुनी पध्दत बंद करून पंचायत राज संस्थांनी त्यांचे लेखे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं. 1 ते 8 या सुधारीत नमुन्यातच ठेवणे शासन स्तरावरून बंधनकारक करण्यात येत आहे. असे असताना पंचायतीने दि. 01/04/2019 ते 31/03/2020 या आर्थिक वर्षाचे लेखे मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) मधील नमुना 1 ते 8 या सुधारीत नमुन्यात ठेवलेले नाही.

**प्रमाणिकरण: ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर जिल्हा पुणे चे सन 2019-20 या कालावधीचे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यात येत आहेत.** (वार्षिक लेख्यांमधील त्रुटींबाबत स्वतंत्रपणे आक्षेपासह प्रमाणित करण्यात येत आहे.)

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 17 (अ) खालील अनियमितता)**
**परिच्छेद क्रमांक 2) महाराष्ट्र लेखा संहिता 2011 नुसार लेखे न ठेवलेबाबत.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नुसार ग्रामपंचायतीचे लेखे व वित्तीय अभिलेखे सुधारीत 1 ते 33 नमुन्यात सन 2012-13 पासून ठेवणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत लेखासंहिता 2011



Scanned with CamScanner

## चालू लेखापरीक्षण

महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम, 1961 मधील नियम क्र. 18 (1) (ब) प्रमाणे

**परिच्छेद क्रमांक 1) आर्थिक स्थिती**

**अ) मत्ता दायित्व:-**

| | दायित्व | रक्कम | मत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | अखर्चित रक्कम यशवंत घरकुल<br>अखर्चित रक्कम वैयक्तिक शौचालय | 00 | ग्रामनिधी | 370225.10 |
| 2 | पाणी पुरवठा | 89073.00 | पाणी पुरवठा | 89073.00 |
| 3 | देणे नळ कनेक्शन डिपॉझिट<br>अनामत देणे बाकी | 3000.00<br>7896.00 | 0.25% जिल्हा ग्रामविकास निधी थकित रक्कम | 0 |
| | 14 वा वित्त आयोग | 1825931.54 | 14 वा वित्त आयोग | 1825931.54 |
| | दलित वस्ती सुधार योजना | 102680.00 | दलित वस्ती सुधार योजना | 102680.00 |
| 7 | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना | 1284.00 | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना | 1284.00 |
| 8 | 0.25% जिल्हा ग्रामविकास निधी थकित रक्कम | 00 | कराची येणे बाकी रक्कम | 4941275.00 |
| 9 | 10% महिला व बालकल्याण कमी खर्च | 0 | 5 % जादा खर्च | 22332.00 |
| 10 | 15% मागासवर्ग कमी खर्च | 83002.00 | 10% जादा खर्च | 18512.00 |
| 11 | 5 % कमी खर्च | 0 | 15% मागासवर्ग जादा खर्च | 0 |
| 12 | मत्तेचे दायित्वावरील अधिक्य | 5358415.10 | दायित्वाचे मत्तेवरील अधिक्य | 0 |
| | एकुण रक्कम रुपये | 7371312.64 | एकुण रुपये | 7371312.64 |

वरील मत्ता व दायित्वमधील तपशिलाबाबत यादी प्राप्त करून घ्यावी.

**ब) ग्रामपंचायतीच्या मागील दोन वर्ष व चालू वर्षातील जमा व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.**

**1. ग्रामनिधी गेल्या तीन वर्षातील जमा व खर्च यांची सरासरी खालीलप्रमाणे होती.**

| वर्ष | सामान्य जमा | सामान्य खर्च |
|---|---|---|
| 2018-2019 | --- | ---- |
| 2019-2020 | 151352.00 | 2330874.55 |
| एकुण | 151352.00 | 2330874.55 |
| सरासरी | 151352.00 | 2330874.55 |

**2. इतर शासकीय अनुदाने / निधी**

| अ.क्र. | निधी/योजना | सन 2019-20 | |
|---|---|---|---|
| | | जमा | खर्च |
| 1 | 14 वा वित्त आयोग | 2298361 | 472429.54 |
| 2 | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना | 1284 | 00 |
| 3 | दलित वस्ती सुधार योजना | 102680 | 00 |

वरील परिशिष्ट अ व ब चे अवलोकन केले असता ग्रामपंचायतीचे उत्पन्न खर्चापेक्षा रुपये 217952.55/- ने कमी व मत्ता दायित्वापेक्षा रुपये 5358415.10/- ने जादा आढळते. यावरुन ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचे निदर्शनास येते. ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता खालील उपाययोजना सूचविण्यात येत आहेत :



Scanned with CamScanner

नियम व सुचनांचे पालन करावे.

अ) ग्रामपंचायत अधिनियम 1958. मधील कलम 38, 45, 52 ची कर्तव्ये योग्यरितीने पार पाडण्यासाठी खालील बाबींचा अवलंब केल्यास पंचायतीच्या उत्पन्नात वाढ करता येईल. आवश्यक त्या सर्व प्रचलित करांचा अवलंब कमाल दराने करून कराची 100% वसुली करावी.

ब) खर्चात काटकसर करण्याची दक्षता घ्यावी.

क) तरतुदींचे अधीन राहूनच खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

ड) कराची थकबाकी वसुलात आणून पुर्तता करावी.

इ) ग्रामपंचायतीच्या भांडवली खर्चात कपात करून तसेच वसुलीचे प्रमाण वाढवुन ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुधारणेचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

ई) नमुना नं. 20 परिपूर्ण नाही. ब-याच रकमांची वसुली समायोजन होणे बाकी आहे. किरकोळ मागणी नोंदवही नमुना नं. 11 यामध्ये व्यवसाय कर, अनुदाने, लिलाव, जागा भाडे इत्यादी बाबीपासून येणे रकमांची मागणी करावी.

फ) कलम 124, 124(अ), 125, 126 नुसार ग्रामपंचायत हद्दीतील उद्योगधंदे, व्यवसाय, घरे इत्यादीवर कराची आकारणी करण्यात यावी.

**क) ग्रामपंचायतीचे मासिक / वार्षिक लेखे:**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं.1 ते 8 मध्ये लेखे ठेवणेबाबत.**

ग्रामपंचायतीने सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात लेखे तपासले असता भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं.1 ते 8 मध्ये लेखे ठेवणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय.

1) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं. 1 ते 8 मध्ये लेखे ठेवणे करीता महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.एम.ए.एस.-2013/प्र.क्र.14/वित्त-6 दि. 05/10/2013 नुसार सन 2013-2014 पासून अनिवार्य केले असून, त्याप्रमाणे लेखे ठेवलेले नाहीत.

2) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे पत्र क्र.सुविले-2013/प्र.क्र. 9/वित्त-6 दि. 03 जुन 2013 अन्वये सन 2013-2014 या आर्थिक वर्षापासून लेखे ठेवण्याची जुनी पध्दत बंद करून पंचायत राज संस्थांनी त्यांचे लेखे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) नमुना नं. 1 ते 8 या सुधारीत नमुन्यातच ठेवणे शासन स्तरावरुन बंधनकारक करण्यात येत आहे. असे असताना पंचायतीने 2019-2020 या आर्थिक वर्षाचे लेखे मॉडेल अकाऊंटींग सिस्टिम (MAS) मधील नमुना 1 ते 8 या सुधारीत नमुन्यात ठेवलेले नाही.

**प्रमाणिकरण: ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर जिल्हा पुणे चे सन 2019-20 या कालावधीचे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यात येत आहेत.** (वार्षिक लेख्यांमधील त्रुटींबाबत स्वतंत्रपणे आक्षेपासह प्रमाणित करण्यात येत आहे.)

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 17 (अ) खालील अनियमितता)**

**परिच्छेद क्रमांक 2) महाराष्ट्र लेखा संहिता 2011 नुसार लेखे न ठेवलेबाबत.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नुसार ग्रामपंचायतीचे लेखे व वित्तीय अभिलेखे सुधारीत 1 ते 33 नमुन्यात सन 2012-13 पासून ठेवणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत लेखासंहिता 2011



Scanned with CamScanner

प्रमाणे लेखे ठेवन्यात आलेले आहेत परंतु लेखे आद्यावत ठेवन्यात आलेले नाही तरी लेखे आद्यावत ठेवावे. तथापी उपलब्ध करुन दिलेल्या लेखांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**परिच्छेद क्रमांक 3) मॉडेल अकाऊंटींग सिस्टीम (MAS) मध्ये लेखे न ठेवलेबाबत**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एम.ए.एस.-2013/प्र.क्र.-14/वित्त 6 मंत्रालय, मुंबई-400032 दिनांक 5 ऑक्टोबर 2013 अन्वये सन 2013-14 या वित्तीय वर्षापासुन मॉडेल अकाउंटींग सिस्टीम(प्रणाली) नमुना नं. 1 ते 8 मध्ये ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे ठेवण्याबाबत अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीने कार्यवाही केलेली नाही.

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 17 (ब) खालील अनियमितता)**

**परिच्छेद क्रमांक 4) ग्रामनिधीच्या शिलकेचा बँक खात्यातील शिलकेशी ताळमेळ न घेणे.**

लेखापरीक्षण कालावधी सन 2019-20 मध्ये ग्रामनिधी ,पाणी पुरवठा व 14 वा वित्त आयोग रोकडवही व बँक पासबुकची तपासणी केली असता, दोन्ही रकमेमध्ये फरक असल्याचे दिसून आले. वित्तीय नियम क्र. 45 अन्वये प्रत्येक महिना अखेरीस रोकडवहीतील शिल्लक रकमेचा हातातील / बँकेतील शिलकेशी पडताळणी करुन तसा तपासणीचा दाखला संबंधित रोकडवही ठेवणा-या शासकीय / पंचायतीच्या अधिका-याने अभिलीखीत करावा असे असताना, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. खाली नमुद केलेल्या ग्रामनिधी यांच्या रोकडवही व बँक पासबुकमधील शिल्लक रकमेमध्ये तफावत दिसुन येत आहे.

| निधी | बँकेचे नाव | बँक खाते क्र. | किर्दीप्रमाणे 31.03.2020 ची शिल्लक | पासबुकप्रमाणे 31.03.2020 ची शिल्लक | फरक |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामनिधी | Central bank of india | 3083411491 | 370225.10 | 510324 | 140098.90 |
| 14 वित्त आयोग | Bank of maharashtra | 60227706959 | 1825931.00 | 1903111 | 77180.00 |
| पाणी पुरवठा | Central bank of india | 3083409094 | 89073.00 | 79073 | 10000.00 |

वरील तफावतीच्या अनुषंगाने योग्य ती तपासणी करुन अनुपालन सादर करावे.

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 17 (ब) खालील अनियमितता)**

**परिच्छेद क्रमांक 5) साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत.व दिवाबत्ती खर्चाबाबत**

1) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक : भाखसं-1088 / 2512 / उद्योग 6, दिनांक 2 जानेवारी 1992 नुसार तसेच शासन निर्णय दिनांक 01/12/16 नुसार साहित्य खरेदी करताना रुपये 1000/- पेक्षा जास्त परंतु 50,000/- पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रुपये 50,000/- पुढील साहित्य खरेदी वृत्तपत्रात जाहिर निविदा मागवून करणे बंधनकारक आहे.

2) माहिती व तंत्रज्ञान विभाग शासन निर्णय क्र. मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दि. 26/11/2014 नुसार रु. 3,00,000/- पेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई -निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात यावी. तसेच क्र. मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दि. 18/12/2014 नुसार शासनाचे सर्व विभाग, सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे (मा.अ.का. अधि.2005 मधील कलम 4 प्रमाणे ) यांना बंधनकारक राहील.



Scanned with CamScanner

3) ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण - 2013 / प्र.क्र.49 / पं रा-7, दिनांक 07/02/2013 नुसार शासनाने पंचायत राज संस्थाअंतर्गत रुपये 1,00,000/- व त्यापेक्षा अधिक किमतीची साहित्य खरेदी / सेवापुरवठा यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक आहे.

4) तसेच सोबतचे परिशिष्टात केलेनुसार साहित्य खरेदी केल्यानंतर प्राप्त साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीत जमा घेऊन वाटप केलेबाबतच्या पोहोच व विनियोग केलेबाबत विनियोग दाखले घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

5) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण 2013/275/प्र.क्र.172/, दि. 19/10/2011 नुसार साहित्य खरेदी व सेवा पुरवठा शासनाद्वारे दरकरार केलेल्या वस्तु या दरकरारानुसार त्या यंत्रणेकडूनच खरेदी करण्यात याव्यात. मात्र या वस्तु / साहित्याचा दर्जा व प्रत खात्री करण्याची जबाबदारी संबधित संस्थांची आहे. त्यासाठी शासनाच्या सक्षम यंत्रणेकडून विहीत कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी करुन घेण्यात यावी. बांधकामाची प्रत व दर्जाबाबत ग्रामविकास विभागाने विहीत केलेल्या निकषानुसार व तपासणी यंत्रणेकडून विहीत पध्दतीने कार्यवाही केली असल्याची खात्री करावी.उपरोक्त 1 ते 4 बाबीचे पूर्ततेअभावी सोबतचे परिशिष्टात नमूद केलेनुसार रक्कम रु. 147154/- लेखापरीक्षनास आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| ग्रामनिधी | | | |
|---|---|---|---|
| प्रमाणक क्र. | दिनांक | तपशिल | रक्कम रु. |
| 03 | 02/05/2019 | संगणक दुरुस्ती /साहित्य (श्रीम.स्वाती शिंदे ) | 5000 |
| 12 | 04/05/2019 | दत्ता इंटरप्रायझेस (पा.पु.अंगणवाडी साहित्य) | 7000 |
| 18 | 14/05/2019 | सागर इलेक्ट्रीकल्स (इलेक्ट्रिक साहित्य ) | 9550 |
| 32 | 21/06/2019 | आदित्य इलेक्ट्रीकल्स (इलेक्ट्रिक साहित्य ) | 18480 |
| 48 | 03/07/2019 | दत्ता इंटरप्रायझेस (पा.पु.साहित्य) | 37144 |
| 53 | 11/07/2019 | बांधकाम साहित्य ( गजराज इंटरप्रायझेस ) | 11100 |
| -- | -- | गटार दुरुस्ती साहित्य ( मल्हारी इंटरप्रायझेस ) | 20000 |
| 63 | July 2019 | आदित्य इलेक्ट्रिकल्स (इलेक्ट्रिक साहित्य ) | 18880 |
| 76 | 09/08/2019 | दत्त इंटरप्रायझेस (पा.पु.दुरुस्ती साहित्य) | 5000 |
| 79 | 09/08/2019 | सद्गुरु इंटरप्रायझेस (इलेक्ट्रिक साहित्य ) | 15000 |
| | | एकूण | 147154 |

**(ब ) दिवाबत्ती खर्चाबाबत**

दिवाबत्ती साहित्याच्या नोंदी व त्यांच्या वापराच्या नोंदी नमुना क्र.18 (महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील नमुना 15 ) मध्ये घेणे, ज्याठिकाणी लाईट निरुपयोगी झाले आहेत, त्याठिकाणी लाईट निरुपयोगी झाली किंवा दुरुस्ती करावयाची असल्यास दुरुस्ती योग्य असल्याबाबत ग्रामस्थांचे तक्रार अर्ज व ग्रामपंचायत सदस्य व वायरमन यांचे साहित्य विनियोगाचे दाखले प्रमाणकांसोबत असणे आवश्यक

| सन | जमा | खर्च | जादा |
|---|---|---|---|
| 2019-2020 | 6205 | 124945 | 118740 |
| एकूण | 6205 | 124945 | 118740 |



Scanned with CamScanner

**परिच्छेद क्रमांक 6) टी.सी.एल.खरेदीबाबत :**
ग्रामपंचायती अंतर्गत सन 2019-2020 या कालावधीत खालीप्रमाणे टि.सी.एल./ मेडीक्लोर खरेदी करणेत आले आहे.

| ग्रामनिधी प्रमाणक क्र. | दिनांक | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 01 | 22/05/2019 | नेहा इंटरप्रायझेस (TCL) | 1475 |
| 01 | 06/07/2019 | नेहा इंटरप्रायझेस (मेडीक्लोर ) | 16992 |
| 04 | 24/09/2019 | श्री. गणेश केमिकल्स (मेडीक्लोर ) | 16992 |
| 05 | 24/09/2019 | श्री. गणेश केमिकल्स (TCL) | 11517 |
| | | एकूण | 46976 |

1) खरेदी केलेल्या टी.सी.एल. मध्ये 33 % क्लोरीनचे प्रमाण असलेबाबत प्राधिकृत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.
2) टी.सी.एल.खरेदीची नोंद नमुना नं.18 (साठा नोंदवही) मध्ये घेणे आवश्यक.
3) टी.सी.एल.खरेदी करताना मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसिजर फॉर परचेस ऑफ स्टोअर्स बाय दि गव्हर्नमेंट डिपार्टमेंट दि. 21/02/1978 च्या भाग-2 मधील 1(जी) व शासन आदेश क्र. संकीर्ण 2001/ सीआरा83 /26/ ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि.27/03/2001 व भाकरा/2002 /2990/ उद्योग 06 /दि.04/02/2003 नुसार शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी करणे बंधनकारक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.
याबाबत खुलासा करुन पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी. (आक्षेपाधीन रक्कम 46976/-)

**परिच्छेद क्रमांक 7) 10% महिला व बालकल्याण खर्चाबाब.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीएन-1044/सीआर/966/05 दि. 12/08/1994 नुसार, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा 1, दि. 24/01/2014 अन्वये व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 124, 131, 132 (स्टँप ड्युटी, जमीन महसुल, उपकर, जमीन समानीकरण) यापासून मिळणा-या उत्पन्नाच्या 10% रक्कम सन 1995-1996 पासून महिला व बालकल्याण करिता खर्च करणे अपेक्षित आहे. सन 2019-2020 या कालावधीत महिला व बालकल्याण करिता रुपये 42150/- इतकी रक्कम खर्च केली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 18512/- इतका जादा खर्च केला आहे. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड यादी, लाभार्थ्यांची मागणी तसेच लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष व योजनेच्या प्रसिध्दीसाठी ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची माहिति मागणी करुनही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. ग्रामपंचायतीचे जमा खर्च पत्रक दरवर्षी पंचायत समितीला पाठवले आहे. तसेच विस्तार अधिकारी पंचायत व गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष तपासणी करुन देखील सदरची बाब त्यांच्या निदर्शनास आली नव्हती काय किंवा आली असल्यास संबंधितांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | सन | उत्पन्न | 10% रक्कम | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-2020 | 236384.00 | 23638.00 | 42150 | 0 | 18512 |

**परिच्छेद क्रमांक 8) 15% मागासवर्गीय खर्चाबाबत.**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.ग्रामपंचायत-1089/54/प्र.क्र.-अ दि. 18/11/1989 अन्वये ग्रामपंचायतीनी आपल्या उत्पन्नाच्या 15% रक्कम मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभ, उन्नती व सामुहिक विकासाच्या अनुज्ञेय बाबीवर खर्च केला पाहिजे. तथापि ग्रामपंचायतीने सन 2019-2020 या कालावधीमध्ये मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी रक्कम रुपये 227002/-एवढा खर्च करने अपेक्षित असताना रुपये 144000/- इतका खर्च केला आहे. म्हणजेच रक्कम रुपये 83002/- एवढा कमी खर्च केलेला आहे. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड यादी, लाभार्थ्यांची पोहोच, लाभार्थ्यांची मागणी, लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष व



Scanned with CamScanner

योजनेच्या प्रसिध्दीसाठी ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची माहिती मुंबई ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम 1961 मधील नियम 10 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. शासन निर्णयातील मुद्दा क्र. 7 मध्ये नमुद केल्याप्रमाणे विस्तार अधिकारी पंचायत किंवा गट विकास अधिकारी यांनी दिलेल्या भेटी दरम्यान सदरची बाब त्यांच्या निदर्शनास आली होती काय. निदर्शनास आली असल्यास काय कार्यवाही केली याचा खुलासा लेखापरीक्षणास करावा.

| अ. क्र. | सन | उत्पन्न | 15% रक्कम | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-2020 | 153352.00 | 227002 | 144000 | 83002.00 | 0 |

**परिच्छेद क्रमांक 9) (अ) अर्थसंकल्पात 5% अपंग कल्याण व पुनर्वसनाकरीता तरतूद व खर्च करणे.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागशासन निर्णय दि. 25/06/2018 अन्वये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5 % रक्कम अपंग कल्याण व पुनर्वसनासाठी खर्च करणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीने 5% रक्कम अपंग कल्याण व पुनर्वसनासाठी आपल्या उत्पन्नाच्या 5 % रकमेपेक्षा जादा खर्च केला आहे. .तरी पुढे अर्थसंकल्पात तरतूद करताना मागील अनुशेषही विचारात घेवून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

| सन | उत्पन्न | 5 % प्रमाणे करावयाचा खर्च | केलेला खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 2019-20 | 153352.00 | 75668.00 | 98000.00 | --- | 22332.00 |

**परिच्छेद क्रमांक ) ब) <u>जिल्हा ग्रामविकास निधी वर्गणीबाबत :</u>**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 133 अन्वये गठीत जिल्हा ग्रामविकास निधी मध्ये कलम 62 (3) अन्वये ग्रामपंचायतीने मागील वित्तीय वर्षात सर्व स्त्रोतापासून (शासनाकडून मिळालेल्या अंशदानासह परंतु राज्य सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचेकडून कोणत्याही विशिष्ट कामासाठी अनुदानाच्या किंवा कर्जाच्या रुपाने मिळालेल्या कोणत्याही रकमांचा अंतर्भाव न करता ) उभारलेल्या तिच्या उत्पन्नाच्या 0.25% इतके अंशदान देईल व या रकमेवर 2 टक्के प्रमाणे व्याज मिळण्याची तरतुद आहे. सन 2019-20 मध्ये एकुण रक्कम रु.8354/-अदा केली आहे.ग्रामपंचायतीद्वारे जिल्हा ग्रामविकास निधी मध्ये जमा होणारा एकुण निधी व त्यावरील व्याज यांचे जिल्हापरिषदेच्या विवरणपत्राशी तपासणी/ताळमेळ घेणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.पंचायतीचे मागील वर्षाचे उत्पन्नाची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे सन 2019-2020 मध्ये भरणा केलेली रक्कम योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

**परिच्छेद क्रमांक 10) विकास कामांवर केलेल्या खर्चाबाबत अभिप्राय (ग्रामनिधि )**

लेखापरीक्षण कालावधीत ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून तसेच ग्रामपंचायत फंडातून विवरण पत्र क्र. 11 प्रमाणे विकास कामावर खर्च केलेला आहे.याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्येत येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 नुसार पन्नास हजारावरील साहित्य खरेदी तसेच कामांची निविदा स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असताना, तसेच माहिती व तंत्रज्ञान विभाग शासन निर्णय क्र. मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39,दि. 26/11/2014 नुसार रु. 3,00,000/- पेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई - निविदा राबविणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही न करता खर्च केलेला आहे. याबाबत खुलासा करावा व यापुढे नियमानुसार कार्यवाही करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. विकास-2011/प्र.क्र.217/पं.रा.8 दि. 15 नोव्हेंबर 2011 मधील परिच्छेद क्र.5(क) अन्वये सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याची गुणवत्ता तपासणी होऊन दर्जाबाबत प्रमाणित होणे आवश्यक असताना, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.साहित्य तपासणीबाबतचा प्रयोगशाळेचा दाखला दप्तरी नाही.याबाबत खुलासा करुन पुर्तता दाखवावी.



Scanned with CamScanner

3) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 चे नियम 59 (1) नुसार नमुना 20 (क) मध्ये मोपमाप पुस्तिकेत विस्तृत नाही. शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक अमल / 2591 / प्र.क्र.262 / 52 / जरोयो-5, दिनांक 18/10/1991 मधील मुददा क्रमांक 7 नुसार सर्व नोंदी वेळच्या वेळी घेऊन मोजमाप पुस्तिका अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

4) ग्रामपंचायतीने सदर बांधकामाकरीता खरेदी केलेल्या साहित्याच्या विनियोगाच्या नोंदी साठा नोंदवही नमुना नं. 18 मध्ये घेतलेल्या नाहीत. कामाकरीता वापरलेले साहित्य व मोजमाप पुस्तकानुसार आवश्यक साहित्य याचा मेळ घेतलेला नाही मेळ घेण्यात यावा व पुर्तता दाखवावी. (महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील नमुना 15 )

5) बांधकामाखालील जागा ग्रामपंचायतीचे मालकीची असल्याबाबतचे आवश्यक ते कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा आहे का नाही याबाबतची पडताळणी करता आली नाही. याबाबत खुलासा करुन पुर्तत दाखवावी.

**परिच्छेद क्रमांक 11 ) आपले सरकार सेवा केंद्र यासाठी अदा केलेल्या रकमेबाबत**

लेखापरिक्षण कालावधीत आपले सरकार सेवा केंद्र यासाठी 14 व्या वित्त आयोगातुन रक्कम रु.97116.54/- अदा केली आहे. तथापि सदर रक्कमेचे विनियोगाबाबत अहवाल तसेच पंचायतसमितीने सदरचे ग्रामपंचायतीस नेमकी कोणती सेवा दिली त्याबाबत सविस्तर अहवाल /डाटा लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही त्यामुळे पडताळणी अभावी सदरचा खर्च लेखापरिक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच पंचायत समितीनी सर्व ग्रामपंचायतीकडून सदरची रक्कम जमा केली आहे तथापि एकत्रित रक्कम किती जमा झाली त्याचा जमा खर्चाचे अहवालाची एक प्रत ग्रामपंचायतीस देणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक 12) 14 वा वित्त आयोगांतर्गत केलेल्या खर्चा बाबत.**

पंचायतीने खाली नमूद केलेल्या विकास काम / साहित्य खरेदीवर खर्च केलेला आहे त्याचा तपशिल तीलप्रमाणेखा

| अ.क्र. | सन | रक्कम | कामाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | 2019-2020 | 45465 | मेडीक्लोर खरेदी, TCL खरेदी |
| | | 79000 | शाळा ई लर्निंग सुविधा |
| | | 60360 | जी.प. शाळा दुरुस्ती |
| | | 25000 | CCTV कॅमेरे दुरुस्ती |
| | | 60000 | गावठाण सुशोभीकरण |
| | एकूण | 269825 | |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. चौविआ 2015/प्र.क्र.26/वित्त-4/ दिनांक 21/12/2015 नुसार प्राप्त अनुदान योग्य असलेबाबत खात्री पटवावी व सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार कामाना मंजूरी घेतलेचे दाखवावे.

2.महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/ उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 नुसार कार्यवाही न करता खर्च केलेला आहे. याबाबत खुलासा करावा व यापुढे नियमानुसार कार्यवाही करावी.

3.ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या साहित्याच्या विनियोगाच्या नोंदी साठा नोंदवही नमुना नं. 15 मध्ये घेतलेल्या नाहीत. वापरलेले साहित्य यांचा मेळ घेतलेला नाही मेळ घेण्यात येऊन पुर्तता दाखवावी.



Scanned with CamScanner

4.शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक सौऊदि-2010 / प्र.क्र.14 / प रा -1, दिनांक 27/10/2010 नुसार महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणाच्या दरकरारावरील एजन्सीकडून सौरदिवे खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केली असले बाबत कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही. कागदोपत्री पुर्तता दाखवावी.

5.शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक संकीर्ण 2013/ 275/ प्र.क्र.172/पंरा 7, दि. 19/10/2011 नुसार साहित्य खरेदी व सेवा पुरवठा शासनाद्वारे दरकरार केलेल्या वस्तु ह्या दरकरारानुसार त्या यंत्रणेकडूनच खरेदी करण्यात याव्यात त्यानुसार कार्यवाही केली असले बाबत कागदपत्राअभावी खात्री करता आली नाही. कागदोपत्री पुर्तता दाखवावी.

उपरोक्त अ .क्र.1 ते 5 बाबत आवश्यक पुर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रुपये 269825/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे

**(ब) अखर्चित अनुदानाबाब**

ग्रामपंचायतीला केंद्र / राज्यशासनाकडून प्राप्त झालेल्या विविध अनुदान / निधी हा संबधित शासन निर्णयाअनुसार विविध केलेल्या मार्गदर्शक तत्वे व सुचनानुसार विहीत कालावधीमध्ये व निकषानुसार खर्च करणे बंधनकारक असतांना ग्रामपंचायतीने खालील प्रमाणे निधी /अनुदान अखर्चित ठेवल्याचे दिसून येते तरी सदर अखर्चित अनुदानाबाबत संबधित शासन निर्णय व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनानुसार कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा रक्कम शासनास वर्ग करण्यात यावी.

| अ.क्र. | निधीचा तपशिल | शिल्लक /अखर्चित राहिलेला निधी |
|---|---|---|
| 1. | 14 वा वित्त आयोग | 1825931.54 |

**(क) प्रमाणकांतील त्रुटीबाबत.**

1) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील नियम 24 (17) नुसार प्रमाणकांद्वारे रक्कम रोखीने किंवा धनादेशाद्वारे प्रदान केल्यानंतर लगेचच प्रमाणकांवर व उपप्रमाणकांवर दिनांकासह चुकते करुन रद्द केले असा शेरा लिहीणे आवश्यक आहे त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील तरतूदीनुसार नमुना नं. 12 प्रमाणे खर्चाचे देयक तयार करुन खरेदी केलेल्या वस्तुंचे उपप्रमाणक मंजूर तरतुद केला खर्च शिल्लक तरतुद यासह इतर आवश्यक माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 13/05/2005 मधील नियम 24 (8) अन्वये देयक तयार करुन नियम 9 अन्वये मंजूरी आदेश नोंद करुन त्यावर सरपंचाची स्वाक्षरी करुन प्रदान करणे आवश्यक आहे.

**<u>परिच्छेद क्रमांक 13:</u> दिवाबत्ती खर्चाबाबत** :दिवाबत्ती साहित्याच्या नोंदी व त्यांच्या वापराच्या नोंदी नमुना क्र.18 (महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील नमुना 15 ) मध्ये घेणे, ज्याठिकाणी लाईट निरुपयोगी झाले आहेत, त्याठिकाणी लाईट निरुपयोगी झाली किंवा दुरूस्ती करावयाची असल्यास दुरूस्ती योग्य असल्याबाबत ग्रामस्थांचे तक्रार अर्ज व ग्रामपंचायत सदस्य व वायरमन यांचे साहित्य विनियोगाचे दाखले प्रमाणकांसोबत असणे आवश्यक

| सन | जमा | खर्च | जादा |
|---|---|---|---|
| 2019-2020 | 6205 | 124945 | 118740 |
| एकुण | 6205 | 124945 | 118740 |

**<u>परिच्छेद क्रमांक 14 :</u> पाणी पुरवठा योजनेवरील दुरुस्तीबाबत**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रं. ग्रापापु/1093/सीआर/448(अ)/39अ दिनांक 17/9/1994 परिच्छेद क्रं.10 नुसार पुर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांची पुर्व इतिहास पत्र (History sheet) व प्रत्र 1.9 मध्ये विद्युत पंपाशी संबंधित History sheet ठेवणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभाग निर्णय क्रं. ग्रापापु/1098/प्रक्र 211/पापु-7 दिनांक 14/12/1998 नुसार प्रत्र 1.8 मधील नळ पाणी पुरवठा योजनासाठी पुर्व इतिहास पत्र (History sheet) ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही. पाणी पुरवठा योजना दुरुस्तीवरील केलेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे तो नियमबाहय रित्या केला आहे. सबब उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. (सोबत ग्रामनिधी व ग्रामीण पाणी पुरवठा निधी विवरण पत्रक 13 नुसार )

| वर्ष | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|
| 2019-20 | 558560 | ग्रामनिधी |
| | 36715 | पाणी पुरवठा निधी |
| | 595275 | |



Scanned with CamScanner

**परिच्छेद क्रमांक 15** ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत.

ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण कालावधी सन 2019-20 मध्ये विहीत लेखापरीक्षण कालावधीत खालील अनुदाने प्राप्त झाली होती. त्याबाबतचे पंचायत समिती / जिल्हा परिषदकडून येणारे अनुदान वाटप पत्र तपासण्यास उपलब्ध नसल्याने जमा रकमा वेळचे वेळी योग्य व अचूक जमा झालेल्या आहेत याची खात्री करता आली नाही. ग्रामनिधीच्या संदर्भात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 131 व 132 नुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्राप्त होणारी जमीन महसुल व समानीकरण कलम 127 नुसार उपकर, तसेच पंचायतीस प्राप्त व्हावयाच्या स्वामित्वधनाच्या रकमा, गौण खनिज अनुदाने, मुद्रांक शुल्क यांची मागणी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे करावयाची आहे. तसेच ग्रामपंचायतीने टी.सी.एल., विद्युत देयके, सरपंच मानधन, कर्मचारी वेतन यावर खर्च केलेल्या रकमावर नियमानुसार मिळणा-या अनुदानांची मागणी शासनाकडून करावी.(सोबत विवरणपत्र क्र. 12 )

**महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी )नियम 1961 मधील नियम क्र.18 (1) (क) प्रमाणे परिच्छेद**

**निरंक**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी )नियम 1961 मधील नियम क्र.18 (1) (ड) प्रमाणे परिच्छेद**

**परिच्छेद क्रमांक 16 ) अ ) मोबाईल मनोरे व अन्य मनोरे यावर कर आकारणी करणेबाबत व ग्रामपंचायत कराच्या आकारणीबाबत**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्र. व्हीपीएम 2606/प्र.क्र.4223/पं.रा. 4(22) , दि. 09/10/2006 अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 124 व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम 1960 नुसार ग्रामीण भागात मोबाईल टॉवर व अन्य व्यवसाय कंपन्यांकडून उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यांवर कर आकारणी करणे आवश्यक आहे. सोबत विवरणपत्र क्र. 5 नुसार थकबाकीची रक्कम रु. 399000/- त्वरित वसूल करावी.

**ग्रामपंचायत कराच्या आकारणीबाबत**

1) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 124 नुसार ग्रा.प क्षेत्रातील घरे, इमारती , कारखाने, कंपन्या, मोबाईल मनोरे यावर कर आकारणी करणे आवश्यक आहे. आकारणी करून नमुना क्रमांक 4 नुसार प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. तथापि सदरची कागदपत्रे अर्धसमास पत्र क्रमांक 1 देवूनही उपलब्ध झाले नाही.

2) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम 1960 मधील -

i) नियम 7 नुसार इमारती व जमिनीवरील कराबाबत ग्रामपंचायतीने कराचे निर्धारण करणे आवश्यक आहे.

ii) नियम 7 (2) (क) व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम 2602/प्र.क्र.1792/पं.रा. 4(22) , दि. 18/06/2002 नुसार धार्मिक आणि शैक्षणिक कार्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या धार्मिक आणि शैक्षणिक संस्थांच्या इमारतीस कर आकारणीस माफी देण्यात आली आहे.

iii) नियम 16 (अ) (3) नुसार ग्रामपंचायतीने मासिक बैठकीत ठराव पास करून जरूर ती सुधारणा आकारणी यादीत करून ती प्रमाणित केली पाहिजे.

iv) नियम 17 नुसार ग्रामपंचायत हद्दीतील स्थावर मालमत्तेच्या / मिळकतीच्या यादीची दर चार वर्षातून एकदा पूर्णपणे फेरतपासणी करून फेरफारासह कराची फेर आकारणी करणे आवश्यक व त्यानुसार वसुली करणे अनिवार्य आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

v) नियम 48 नुसार ग्रामपंचायतीने करमणूक कराचे दर निर्धारित करावेत. तसेच करमणूकीचा जो खेळ धर्मार्थ कारणासाठी केला असेल व त्यापासून आलेल्या उत्पन्नाचा त्या कारणासाठी उपयोग केला असेल अशा करमणूकीच्या खेळास लागू असणार नाही.

तसेच ग्रामपंचायतीने आकारलेल्या विविध करांची महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम 1960 मधील नियमानुसार आकारणी करणे आवश्यक आहे.

vi) आकारणी यादीत वाढ / घट विचारात घेऊन पानवार बेरजा मारून वर्षासाठी मागणी कायम केलेबाबत पंचायतीचा ठराव आवश्यक आहे. आकारणी यादीत घरांचा विनियोगाबाबत रहिवास/वाणीज्य असे नमुद करणे आवश्यक आहे. तथापि वाढ व घट नोंदवही अर्धसमास पत्र क्रमांक1 देवूनही उपलब्ध झाली नाही.

3) सन 2019-2020 मध्ये शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 21/11/2015 प्रमाणे, ग्रामपंचायत कर व फि (सुधारणा) नियम 2015 अन्वये व शासन परिपत्रक परास 2016/प्र.क्र.17/परा-4 दिनांक 18/7/2016 अन्वये व अधिसूचनेतील नियमानुसार भांडवली मुल्यानुसार ग्रामपंचायतीने ठराव करून कर आकारणी केली आहे व त्याची आकारणी सन 2014-15 पासुन करण्यात आली आहे त्याअनुषंगाने आकारणी नोंदवही नमुना नंबर 8 ची 10 टक्के तपासणी करता खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अधिसूचनेतील मुद्दा क्रमांक 9 नुसार आकारणी समितीत 5 सदस्यांचा समावेश करावयाचा असुन त्यातील एक सदस्य हा शाखा /कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग व विस्तार अधिकारी ,पंचायत हे सदस्य उपस्थित असलेचे दिसून आले नाही. उपस्थित असलेबाबत इतिवृत्त/ठराव उपलब्ध नाही.

अधिसूचना व जिल्हापरिषदेकडील पत्रानुसार सन 2019-20 साठीची आकारणी ही जी वाढीव नवीन बांधकामासाठी नगर विकास विभागाकडील रेडी रेकनरमध्ये ठरवुन दिलेल्या दराप्रमाणे उपरोक्त अधिसूचनेनुसार करावयाची आहे. व जुन्या मालमत्तांची आकारणी (ज्यांचे कोणतेही वाढीव बांधकाम केले नाही अशा मालमत्ता ) ही जुन्या गतवर्षातील दराप्रमाणे करावयाची आहे. तथापि त्यांची नविन बांधकामे व वाढीव बांधकामाचे अर्ज, नस्ती व केलेली आकारणी त्याची समितीने केलेली पडताळणी त्यावरील अभिप्राय तसेच संनियंत्रण समितीचे त्यावरील अभिप्राय आदी माहीती व अभिलेखे अर्धसमास पत्र क्रमांक 1 देवूनही उपलब्ध झाले नाही. सदर बाबत समितीने पडताळणी केली किंवा कसे , तसेच



Scanned with CamScanner

उपरोक्त प्रमाणे सन 2019-20 ची आकारणी व सन 2019-20 ची आकारणी यासाठी कॉम्पुटर सॉफ्टवेअर (खाजगी कंपणीचे ग्लोबल सिस्टीमचे सॉफ्टवेअर ) आकारणी ची परिगणना करण्यासाठी u वापरण्यात आले त्याती सत्यता व अचूकता कोणत्याही शासकीय प्रणाली व्दारे तपासण्यात आलेली नाही. त्यासाठी गठित समितीने योग्य प्रमाणे पडताळणी आकारणी नोंदवहीचे प्रत्येक पृष्ठ साक्षांकित करून आकारणी केलेचा संनियंत्रण समितीने साक्षांकित केलेला अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा.

4) लेखापरिक्षण वित्तीय वर्ष सन 2019-20 साठी नवीन आकारणी बाबत आराखडे 7/12 उतारे, अकृषिक दाखले, बांधकाम सरकारी/गायरान जमिनीत नसलेबाबत दाखले महामार्ग प्राधिकरण दाखले, संबधीत नियोजन प्राधिकरणाचे मंजुर आराखडे, सागरी सिमेबाबतचे ( सी.आर.झेड ) प्राधिकरण इत्यादी कागदपत्रे नस्तीसोबत जोडणे आवश्यक आहे. अहवाल व प्रकरणे उपलब्ध झाली नाहीत.

पंचायतीची सन 2019-20 या वर्षातील आकारणी नोंदवहीची पडताळणी करता नवीन घरांच्या नोंदीबाबत बांधकामास परवानगी देताना 7/12 चे उतारे ,नगर भूमापनाचा दाखला ,बिगर शेती योजनेसाठी जिल्हाधिकारी यांचेकडील मंजुरी आदेश, बांधकामाचा आराखडा खर्चाचे अंदाजपत्रक ,तसेच बांधकाम सरकारी /गायरान क्षेत्र किंवा हिरव्या पट्ट्यातील नसले बाबत सक्षम अधिकाऱ्याचे दाखले लेखा परीक्षणास मागणी करूनही उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदरच्या नोंदी नमुना नंबर 8 आकारणी नोंदवहीमध्ये बरोबर व नियमान्वये घेतलेल्या असलेबाबत खात्री देता येत नाही त्यामुळे अकृषक जमिनीचा वापर शासन शुल्क न भरता अकृषक म्हणून केल्यामुळे शासनाचे नियमाप्रमाणे झालेले नुकसान परीगणित करून त्याची वसुली करावी. तसेच मा.मु.का.अधिकारी जि.प.पुणे यांचे दि.29/12/2010 रोजीचे पत्र क्र.जी.प.पंचायत/1603 प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे असताना पंचायतीने त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे दिसून येत नाही तरी नियम बाह्यतेबाबत खुलासा करावा . त्याअनुषंगाने नमुना नंबर 8 ला जी वाढ झाली आहे. त्यांची आकारणी नोंद योग्य प्रकारे उपरोक्त नियमांनुसार केली असल्याची खात्री करण्यात आली नाही.

**ब ) खुल्या जागेवरील अतिक्रमण रक्षण करणेबाबत :**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण परिपत्रक दि. 04/12/2010 नुसार खुल्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून संबंधित ग्रामपंचायतीने दक्षता घेणे आवश्यक आहे. ग्राम पंचायतीने या जागेवरील अतिक्रमणाचे रक्षण न केल्यामुळे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे नुकसान होते. तथापि सन 2019-20 मध्ये अतिक्रमनाबाबत नस्ती /नोंदवही /कोर्ट प्रकरण/तक्रार आदी अभिलेखे उपलब्ध न झालेने पडताळणी करता आली नाही.

ड) ग्रामपंचायतीचे सन 2019-20 अखेर लेखापरीक्षण केले असता कराच्या रकमा थकीत असलेचे दिसून आले. ग्रामपंचायत कायदा कलम 129 अन्वये कराची वसुली 100% करणे बंधनकारक असताना ती 100% वसूल का केली नाही व आता उर्वरित वसूल होणे रक्कम त्वरित वसूल करून पंचायत फंडात जमा करावी

**क) कराचे मागणीपत्रक (थकबाकी पत्रकाबाबत)**

ग्रामपंचायतीचे सन 2019 - 2020 अखेर लेखापरीक्षण केले असता, कराच्या रकमा थकीत असल्याचे दिसून आले. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 129 अन्वये कराची वसुली 100% करणे बंधनकारक असताना ती 100% वसुल का केली नाही व आता उर्वरित वसुल होणे रक्कम त्वरीत वसुल करुन ग्रामनिधीत जमा करावी. सन 2019 -2020 अखेर येणे बाकी रक्कम रुपये 3924809/- त्वरीत वसुल करावी.

| अ.क्र. | कराचा तपशिल | थकबाकी |
|---|---|---|
| 1 | घरपट्टी ,वीज कर, आरोग्य कर | 3141510 |
| 2 | पाणी कर | 783299 |
| | एकुण | 3924809 |



Scanned with CamScanner

**परिच्छेद क्रमांक 17) साप्ताहिक आणि मासिक लेखा विवरणपत्र सादर करणेबाबत :**
मुंबई ग्रामपंचायत नियम 1959 मधील 57 (4) नुसार सचिव (ग्रामसेवक) निधीत जमा करण्यात आलेल्या आणि त्यातून देण्यात आलेल्या व शिल्लक रकमा यांचा तपशील देणारे एक साप्ताहिक विवरणपत्र ग्रामपंचायतीला आणि मासिक लेखा विवरणपत्र गटविकास अधिकाऱ्याला सादर करतील.

**परिच्छेद क्रमांक 18) जन्ममृत्यु नोंदवही अद्यावत ठेवणेबाबत :**
मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 8 व 12 नुसार आणि शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम-2004 / प्र.क्र.3 / पं रा-3, दिनांक 02/01/2004 व दि. 10/11/2004 नुसार ग्रामपंचायतीने जन्ममृत्युच्या नोंदी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच ग्रामसभेच्या ठिकाणी किंवा ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर महिन्याभरात किंवा या आधीचे ग्रामसभेनंतर झालेले मृत्यु व नव्याने झालेले जन्म याबाबतची यादी लावावी.

**परिच्छेद क्रमांक 19) आस्थापनेवरील खर्च :**

1) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम /2689 /2297 -21, दिनांक 29/12/1989 नुसार ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या 25% पेक्षा जास्त खर्च आस्थापनेवर करू नये.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम 2699/प्र.क्र.206(1)/21, दि. 21/01/2000 अन्वये शासनाने ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्येच्या वर्गवारीनुसार कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित करून किमान वेतनासाठी येणाऱ्या खर्चाच्या 50 % रक्कम अनुदान म्हणून देण्याचा निर्णय व उर्वरित 50 % खर्च स्वउत्पन्नातून संबंधित ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम 1001/प्र.क्र.1144/21, दि. 24/12/2001 अन्वये कर्मचाऱ्यांना त्यांचे किमान वेतन धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे.

4) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम 2600/प्र.क्र.685/21, दि. 21/11/2000 अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (कर्मचारी) भविष्य निर्वाह निधी नियम 1961 लागू करण्यात आला असून नियम 6 अन्वये भविष्य निर्वाह निधी नियमितपणे कपात करणे आवश्यक आहे. तसेच नियम 7 नुसार कर्मचाऱ्याच्या वर्गणीइतकीच रक्कम ग्रामपंचायतीने अंशदान देणे आवश्यक आहे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम 2600/प्र.क्र.685/21 , दि. 22/11/2000 अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके व त्यातील नोंदी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

6) विक्रीकर विभाग अधिनियम 1975 नुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनातून विहीत दराने **व्यवसायकर** कपात करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

7) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या अग्रिम रकमेचे समायोजन त्यांच्या मासिक वेतनातून करावे.

**परिच्छेद क्रमांक 20) मालमत्ता नोंदवही अपूर्ण असलेबाबत.**
ग्रामपंचायतीची स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नं.25 व जमीनीची नोंदवही नमुना नं.27 चे लेखापरीक्षण केले असता, सदरची नोंदवही अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. पंचायतीकडे हस्तांतरीत स्थावर मालमत्ता व जमीन तसेच पंचायतीच्या स्वनिधीतुन व विविध निधीतुन निर्माण झालेल्या मालमत्ता किती व त्या सुरक्षित व विहीत वापरात आहेत याचा तपशिल उपलब्ध होत नाही. पंचायत मालमत्तेवर व जमीनीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी नमुना नं. 25 व 27



Scanned with CamScanner

मधील नोंदी पूर्ण करून आज अखेर पंचायतीकडे असलेल्या स्थावर मालमत्ता व जमीनीबाबत 7/12 खाते उतारे काढून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय जिपज-2000/प्र.क्र. 156/पंरा-8 दि. 29/01/2004 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांचेकडून सर्व मालमत्ता प्रमाणित करून सुस्थितीत सुरक्षित व विहीत वापरात असलेबाबत खात्री करावी.

**परिच्छेद क्रमांक 21) स्थायी अग्रिम :**

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 मधील नियम 14 नुसार ग्रामपंचायतीला किरकोळ खर्च भागविण्यासाठी ग्रामसचिवाकडे रु. 1000/- पर्यंत स्थायी अग्रिम ठेवण्यास परवानगी आहे. प्रत्येक महिन्याच्या शेवटी सरपंचाने स्थायी अग्रिम रकमेचा लेखा व शिल्लक रक्कम बरोबर आहे हे पडताळणी करून तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक 22) नवीन घरांच्या नोंदीबाबत**

कर आकारणी नोंदवहीची पडताळणी करताना ग्रामपंचायत हद्दीतील नवीन घरांच्या बांधकामास परवानगी देताना सर्व प्रकारच्या मंजुऱ्या/दाखले/बांधकाम आराखडा/खर्चाचे अंदाजपत्रक, बांधकाम सरकारी/गायरान किंवा हरीत पट्टयातील नसल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने ग्रामपंचायतीने बांधकाम परवाना देतांना सदर कागदपत्रांची पुर्तता करून घेतली नाही

**परिच्छेद क्रमांक 23) घराची नोंदणी पति-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणेबाबत**

शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं. व्हीपीएम/2603/ प्रक्रं. 2068/पंरा 4 दिनांक 20 नोव्हेंबर 2003 नुसार महिलामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना पतीच्या मालमत्तेत हक्क देणे मुलभुत गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील घराच्या नोंदी फॉर्म 8 मध्ये पती व पत्नी यांच्या संयुक्त नावाने करण्यात यावी.

**परिच्छेद क्रमांक 24) पावती पुस्तकाबाबत**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग आदेश क्रं. व्हीपीएम/2422/12815/8/सीआर /6/23 दिनांक 31 मार्च 1980 चे परिच्छेद (2)(5) अन्वये ग्रामपंचायतीने वसुलीच्या कामी उपयोगात आणावयाची पावती पुस्तके गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडुन प्रमाणीत करून पावती पुस्तक साठा नोंदवहीत नोंद घेवूनच वसुलीच्या कामी उपयोगात आणावयाची असताना पंचायतीने लेखापरिक्षण वर्षात उपयोगात आणलेले पावती पुस्तके प्रमाणीत केलेली आहेत परंतु पावती पुस्तक साठा नोंदवहीत नोंदी न घेता उपयोगात आणली आहे. त्यामुळे सदर पुस्तके अधिकृतरित्या उपयोगात आणल्याची पडताळणी करता येत नाही. तरी सदर पावती पुस्तकाव्दारे रकमा जमा करून आर्थिक गैरव्यवहार किंवा अपहार न होण्याबाबत ग्रामपंचायतीने दक्षता घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रं. 25 )मासिक सभा /इतिवृत्ताबाबत**

पंचायतीकडील मासिक सभा नोंदवहीची पडताळणी करता खालीलप्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या.

1. मासिक सभा इतिवृत्त अपुर्ण आहे
2. मासिक सभा इतिवृत्तात मजकूर पुर्ण झालेनंतर त्यावर सरपंच यांची मान्यता असलेबाबत स्वाक्षऱ्या नाहीत.
3. मासिक सभा इतिवृत्ताची एक प्रत वरिष्ठ कार्यालयास सादर केलेबाबतचा दिनांक व पोहोच दप्तरी उपलब्ध नाही ती उपलब्ध करुन सदर मासिक सभा इतिवृत्त/मजकुरास वरिष्ठ कार्यालयाकडुन याबाबत योग्य ती कार्यवाही झालेबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.



Scanned with CamScanner

) महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 चे नियम 18 (2) प्रमाणे दाखले

**क-प्रमाणे** प्रमाणे पंचायतीने महसुली तारणावर कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले आहे / नाही.

**ड-प्रमाणे** प्रमाणे पंचायतीने असलेल्या ठेवी, आगाऊ रकमा तारण देऊन पुर्णत: सुरक्षीत केलेल्या नाहीत.

**इ-प्रमाणे** पंचायतिने जिल्हा ग्रामविकास निधीतुन कर्ज घेतलेले आहे / नाही. तसेच अशा कर्जाचीमुद्दल / व्याज परतफेडीसाठी अदाजपत्रकात तरतुद केलेली नाही.

**फ-प्रमाणे** पंचायतीने नविन उपक्रम हाती घेतलेला नाही. तथापि शासनाच्या आदेशाप्रमाणे ग्रामनिधी व्यतिरीक्त ग्रामीण पाणी पुरवठा योजना , १४ वा वित्त आयोग, पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना याचे स्वतंत्र लेखे ठेवलेले आहेत.

**ग-प्रमाणे** पंचायतीचे वार्षिक लेखे तपासले असता, अहवालात नमुद केलेल्या आक्षेपांखेरीज व लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यातील उणीवा खेरीज सादर केलेले वार्षिक लेखे तपासले असता , दस्तऐवजाच्या सत्यतेस अधिन राहुन ते बरोबर आढळुन आले.

**ह-प्रमाणे** पंचायतीचे दप्तरी कामकाज एकंदरीत समाधानकारक आढळुन आले. या अहवालात नमुद केलेल्या सुचनानुसार सुधारणा करावी.

**आय-प्रमाणे** लेखापरिक्षण अहवालासोबत खालीलप्रमाणे विवरणपत्रे जोडली आहेत.

1) जमा-खर्च विवरणपत्रक २) थकबाकी पत्रक 3) अनुदान पत्रक

**नादायित्व प्रमाणपत**

प्रमाणित करण्यात येते की, सन- २०१९-२० या कालावधीचे लेखापरिक्षण ग्रामपंचायतीने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरून केले आहे. उपलब्ध न केलेले अभिलेखे, अहवालामध्ये नमुद केलेल्या परिच्छेदामधील अप्राप्त अभिलेखे यामधील आर्थिक अनियमितता, आर्थिक गैरव्यवहार यासाठी लेखापरिक्षक जबाबदार नाही.

महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम 1961 चे नियम 21 प्रमाणे लेखापरिक्षणात आढळुन आलेल्या आक्षेपांबाबत सरपंच / उपसरपंच यांचेशी समक्ष चर्चा केली.

कनिष्ठ/वरिष्ठ लेखापरिक्षक
स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे

अहवाल मान्य,
~~स.लै.प.अ.~~ वरिष्ठ लेखापरीक्षक
स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
२) मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोर जि.पुणे

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिवळडे
ता: भोर जि पुणे

सरपंच
ग्रामपंचायत शिवळडे
ता. भोर ,जि.पुणे



Scanned with CamScanner

ग्रामपंचायत शिंदेवाडी ता. भोर जि. पुणे

## विवरण पत्र क्र. १

**लेखा परीक्षण कालावधीत ग्रामपंचायतीचा कार्यभार पहात असलेल्या पदाधिकारी/अधिकारी.**

ग्रामपंचायतीचे नाव: शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ. क्र. | तपशील | संपूर्ण नांव | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | सरपंच | सौ. शोभा अशोक ओव्हाळ | 1/4/2019 | 31/3/2020 |
| २. | ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी | श्री. डी. आर कुलकर्णी | 1/4/2019 | 31/3/2020 |
| ३. | | | | |

## विवरण पत्र क्र. २.

ग्रामपंचायतीने विविध बँकेत उघडलेल्या बँक खातेबाबतचा तपशिल

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता भोर जि पुणे



Scanned with CamScanner

ग्रामपंचायतीचे नाव शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | खाते असलेल्या बँकेचे नांव | शाखेचे नांव | खाते क्र. | संयुक्त आहे/नाही | दि. ३१/०३/२०२० अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामनिधी | सेन्ट्रल बँक इंडिया | वेळू | 3083411191 | होय | 3602245.90 |
| २. | पाणीपुरवठा निधी | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया | वेळू | 3083409054 | होय | 880631/- |
| ३. | १४ वा वित्त आयोग | बँक ऑफ महाराष्ट्र | भोर | 60227709959 | होय | 96,24,831/- |
| ४. | दलितवस्ती सुधार योजना | बँक ऑफ बडोदा | भोलावडे भोर | 45050100005774 | होय | 9,026,901/- |
| ५. | पर्यावरण संतुलित समृद्धी योजना | ॲक्सिस बँक | शिवाजीनगर | - | - | - |
| ६. | म.गां.राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | सेन्ट्रल बँक वेळू | वेळू | | | 9281/- |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता: भोर जि पुणे

<u>विवरण पत्र क्र. ३</u>

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम(१२९ (१),(२) व (४) तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग पीआरसी/१०७६/३३३५/२३, दि. ३१/०१/१९७७ अन्वये वसुली करावी. सन- ~~२०१८-१९~~ 2019-20**
**(घरपट्टी,दिवाबत्ती व आरोग्य कर)**

ग्रामपंचायतीचे नाव: शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | मागणी रुपये | वसुली रुपये | धकबाकी रुपये |
|---|---|---|---|
| | | | |



Scanned with CamScanner

ग्रामपंचायत शिंदेवाडी ता. भोर, जि. पुणे

| | मागील धकबाकी | चालू मागणी | एकूण | मागील धकबाकी | चालू मागणी | एकूण | मागील | चालू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घरपट्टी | २२०६४८४ | २०७९८४० | ४२८६८३३ | ४९६६८३ | ५८०६३० | १०७७४३३ | ५८८८६८ | १२६३५८० | ३०४३३४८ |
| दिवाबत्ती | २५६३५ | २२८५५ | ४८४९० | ३५५० | ३०४४ | ६५९४ | २२०८५ | १९८०१ | ४१८८६ |
| आरोग्य कर | २५६३५ | २२८५५ | ४८४९० | ३५५० | ३०४४ | ६५९४ | २२०८५ | १९८०१ | [illegible] |
| एकूण | २०८२३५४ | २०६७०८६ | ४१४९४४० | ५१३६८४ | ५८६७१८ | ११०० ६०२ | ६३२०५८ | १३०३१८२ | ३९४५४९० |

## पाणीपट्टी धकबाकी विवरण

| अ.क्र. | मागणी रुपये | | | वसुली रुपये | | | धकबाकी रुपये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील धकबाकी | चालू मागणी | एकूण | मागील धकबाकी | चालू मागणी | एकूण | मागील धकबाकी | चालू मागणी | एकूण |
| सामान्य पाणीपट्टी | ८१६० | ३०० | ८४६० | — | — | — | ८१६० | ३०० | ८४६० |
| खास पाणीपट्टी | ६१४००० | २४२००० | ८५६००० | ३११६९ | २४००० | ५५१६९ | ५८२८३१ | २१८००० | ८००८३१ |
| एकूण | ६२२१६० | २४२३०० | ८६४४६० | ३११६९ | २४००० | ५५१६९ | ५९०९९१ | २१८३०० | ८०९२९१ |

कार्यालय
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता भोर जि पुणे

विवरण पत्र क्र. ४

ग्रामपंचायत हद्दीतील कारखाना व इतर कर वसुली धकबाकी. सन- २०१९/२०



Scanned with CamScanner

ग्रामपंचायतीचे नाव शिंदेवाडी तालुका : भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | ग्रा.पं. हद्दीतील कारखाने संख्या | कारखानाकराची सुरुवातीची थकबाकी | चालू वर्षातील मागणी | चालू वर्षातील वसुली | दि .३१/०३/२०२० अखेर थकबाकी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 42 | 343590 | 599933 | 54886 | 516866 | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**ग्रामपंचायत कर वसुली हद्दीतील कारखान्यांची नांवे आकारलेला कर व दर जागेच्या क्षेत्रफळाचा तपशील व इतर थकबाकी**

| अ.क्र. | ग्रा.पं. हद्दीतील कारखान्याचे नांव | कारखान्याचेजागेचे क्षेत्रफळ | आकारलेले कराचा दर रु. | एकुण आकारलेले कर | सन-१९-२० मध्ये केलेली वसुली | दि.३१/०३/२०१९ अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | सिनर्जीस | 98638 | 2.43 | 46384 | 46384 | — |
| 2) | मेरमेट कंपनी | 24709 | 2.44 / 2.45 | 68920 | 68920 | — |
| 3) | पिकाम्य | 84543 | 99352 | 99352 | 99352 | — |

सरपंच
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर जि. पुणे

विवरण पत्र क्र. ५

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.व्हीपीएम-२६०६/प्रक्र-४२२३/परा-४(२२), दि.९/१०/२००६ अन्वये कर आकारणी करावी.ग्रामपंचायत हद्दीतील उभारलेले मनोरे (मोबाईल टॉवर) बाबतचा तपशील. सन—२०१९-२०**

ग्रामपंचायतीचे नाव शिंदेवाडी तालुका : भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | ग्रामपंचायत हद्दीतील उभारले | मनोरे (टॉवर)संख्या | मनो-या साठीआकारण्यात | आकारण्यात आलेल्या दराबाबत ठराव | मागील थकबाकी | सन-१८-१९ ची मागणी - | एकुण मागणी रु. | चालू वर्षातील वसुली रु | दि .३१/०३/२०२० अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| | ले मनोरे | | आलेले कर | क्र./दिनाक | | | | मा.पं.Fx.5 | धकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 2 | | ९५००० | — | ३००००<br>९६२००<br>१८००० | ९५०००<br>९५०००<br>९५०० | ७५०००<br>९६६००<br>९६६०० | —<br>—<br>— | ७५०००<br>९६६००<br>९६६०० |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर जि. पुणे

## विवरण पत्र क्र.६

ग्रामपंचायत लिलाव/हर्रासी करिता असलेल्या मालमत्ता व वस्तूबाबत तपशील. सन-२०१८-१९ 2019-20

ग्रामपंचायतीचे नाव:- शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | मालमत्ता व वस्तूचे नांव | मालमत्ता व वस्तू लीलीवाचा कालावधी | अटीनुसार ठरलेली अनामत रुपये | बोलीनुसार लीलीव घेणाराचे | लिलावाची रक्कम रु. | भरणा केलेली रक्कम | ३१/०३/२०१८ अखेर धकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बाजार लिलाव | - | | | | | |
| 2 | फळझाडे | | | | | | |



Scanned with CamScanner

ग्रामपंचायत शिंदेवाडी ता. भोर, जि. पुणे.

## विवरण पत्र क्र. ८

ग्रामपंचायतीने दिलेल्या सर्वसाधारण नळ पुरवठा व विशेष नळ पुरवठा बाबत तपशिल. सन- २०१८-१९ १९/२०

ग्रामपंचायतीचे नाव- शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | नळ कनेक्शनतपशिल | नळ कनेक्शनसंख्या | आकारलेले दर | चालू वर्षातील वसुली रु. | ३१/०३/२०१९ अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण कनेक्शन | — | 300/- | — | निरंक |
| 2 | विशेष नळ कनेक्शन | २९३ | १००० | ५११६९ | ६५३९९९१ |
| 3 | नळ अनामत | — | १००० | ३००० | — |

## ग्रामपंचायत हद्दीतील/पंचायतीकडे असलेल्या हातपंप/विद्युत पंप/जनरेटर/ट्रॅक्टर/ॲपे/फॉगिंग मशीन इतर बाबत तपशिल.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | एकूण संख्या | चालू स्थितीत | बंद स्थितीत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | हातपंप | ३ | २ | १ | |
| 2 | विद्युत पंप | ५ | ४ | १ | |
| 3 | ॲपे | — | — | — | |
| 4 | ट्रॅक्टर | — | — | — | |
| 5 | फॉगिंग मशीन | २ | १ | १ | |
| 6 | इतर घंटागाडी | १ | १ | — | |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर जि पुणे

## विवरण पत्र क्र. ९

परिपत्रक-१०९२/२००१/प्र.क्र.-१/दि.२६/०५/१९९५ अन्वये मालमत्तेची नोंदणी केल्याशिवाय त्यावर नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरल्याशिवाय फेरफार करण्यासाठी स्वीकारू नये.

ग्रामपंचायतीने वर्षात केलेल्या फेरफार बाबत तपशिल. सन- २०१८-१९-२०



Scanned with CamScanner

| अ.क्र. | कामाचे नांव व जागेचा तपशिल | योजनेचे नांव/जि.पं/ग्रामनिधी | ठराव क्र./दिनांक | तां. मं.क्र./दिनांक | अंदाजपत्रकीय रक्कम. | प्रत्यक्ष खर्च | मुल्यांकन | मोजमाप पुस्तकक्र./दि. | काम पूर्ण दिनांक | न.नम.२६ वर नोंद घेतलेबाबतचे पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ~~१~~ ३) | ~~दफन भूमी~~ रस्ता कांक्रीट करणे | ग्रामनिधी | - | - | २८८८७६ | 29600 | | 9ले3 | | -08 |

ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर, जि. पुणे

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर जि पुणे

ग्रामपंचायत शिंदेवाडी ता. भोर, जि. पुणे

<u>विवरण पत्र क्र. १२</u>

ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या अनुदानाचा तपशिल. सन- २०१९-२०२०

ग्रामपंचायतीचे नाव: शिंदेवाडी तालुका :- भोर जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | सामान्य पावती क्र./दिनांक | रक्कम रुपये | अनुदानाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | १/ ऑगस्ट१९ २/ नोव्हेंबर | ६३८५५४/- | मा. ग. विआ. अनुदान- |
| २ | ४/ जानेवारी१९ | २८६४२८/- | पुणे जिल्हा नियोजन अनुदान. |
| ३ | ५/ ६/ जानेवारी२० | १२५००१/- | संपूर्ण स्वच्छता अनु- |
| ४ | १०/ जानेवारी२० | २६००१/- | स्वच्छ भारत मिशन |
| ५ | ५, ६/ २५।०१।१९ | २३८८२८ | मुद्रांक शुल्क अनु— |
| ६ | [illegible] | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

<u>विवरणपत्र क्र. १३</u>

(नमुना क्र. 3 व 4 ग्रामनिधी)

वार्षिक जमा खर्च अहवाल सन- २०१९-२०२०

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता: भोर जि पुणे



Scanned with CamScanner

## ग्रामपंचायत शिंदेवाडी . ता भोर . जि पुणे

### - जमाखर्चपत्रक - (ग्रामनिधी) २०१९-२०

| जमाबाब | रक्कम | खर्चबाब | रक्कम |
|---|---|---|---|
| घरपट्टी | ११८०८०४१- | नोकरपगार | ९८८९८२५- |
| दिवाकर | ६२७५१- | सार्व स्वच्छता | १५८४७४- |
| आरोग्यकर | ६२०५१ | घनकचरा व्यवस्थापन | १२१२८०- |
| पाणीपट्टी कुंड | २२१६१- | हंगामी काम | ९०,०००- |
| दंड | २५६११- | बँक कमिशन | ९३२/३० |
| ग्रा.गा.वि.अनु | ६३०५२५- | कॉम्प्युटर दुरुस्ती | ५०००- |
| बँक व्याज जमा | ४८६२२५- | पाणी टँकर बील | २३५८५०- |
| पु.जिल्हा नियोजन अनु | २०६४२७९- | सदस्य बैठक भत्ता | ६०००- |
| मुद्रांक शुल्क अनु | २३६३८४- | सरपंच मानधन | १०,०००- |
| संपूर्ण स्वच्छता अनु | १२५००- | पा.पु साहित्य दु. | ५५६५६० |
| स्वच्छ भारत मिशन | २६००- | इले दुरुस्ती साहित्य | १२७९८५ |
| अनामत | ६८८६- | ऑफिस साहित्य | ५६१८१- |
| अॅडव्हान्स परत | ४०००- | P.F. कर्मचारी | ६३१८२- |
| फी | ३००- | वाहन देखभाल दुरुस्ती | २२०१०- |
| | | गटर दुरुस्ती | १३६५०१- |
| | | सार्व आरोग्य | ९०१४०- |
| | | दफनभूमी काम | ३०११६०- |
| | | कर्मचारी बूट छत्री | २४००- |
| | | १०% म.बा.क खर्च | ४२१५०- |
| | | २५% अंशदान | ८३५४- |
| | | सार्व इमारत दुरुस्ती | ८०८३०- |
| | | जाहीरात खर्च | ४६४०- |
| | | G.S.T. | ६०३८.२५ |
| | | ५% खुट | ९०. |
| | | कर्मचारी प्रवास | ९०००. |
| | | ५% अपंग कल्याण | ९८०००- |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | गर्भसुरक्षा रक्षक मानधन | २६००।- |
| | | दिवाळी बोनस / मानधन | २८०००।- |
| | | पाणीशुद्धीकरण TCL | २६५०।- |
| | | अभिलेख | ६३६३०।- |
| | | चेक फारम | ३३९०५।- |
| | | पावसाळा पाणी अडविणे | २५००।- |
| | | डेडस्टॉक | ९६३००।- |
| | | १५% मागास खर्च | १८८०००।- |
| | | डिजिटल ग्राम | २५००।- |
| | | रस्ता कॉंक्रीट करणे | २१६०००।- |
| | | बंदिस्त गटर | २८९३०।- |
| | | किरकोळ | ९९३०।- |
| | | वृक्षसंवर्धन | २८००।- |
| | | C.C.T.V कॅमेरे बसविणे | ३३६३५।- |
| | | कोरोना जाहिरात प्रसिद्धी | ७५६०।- |
| | | ऑक्सीजन बसविणे मटेरियल | ९८०००।- |
| जमा | ९८८०६२८।- | खर्च | ३०६९३९२४५५ |
| सुरुवि | १५६०८०८।६५ | अखेर शिल्लक | ३६०२२५।९० |
| (एकूण) | ३८८९५३६।६५ | (एकूण) | ३८८९५३६।८५ |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत [illegible]
ता: भोर जि: पुणे

ग्रामपंचायत शिंदेवाडी. ता. भोर. जि. पुणे

जमाखर्च (पाणीपुरवठा) सन २०१९/२०

| जमाबाब | रक्कम | खर्चबाब | रक्कम |
|---|---|---|---|
| पाणीपट्टी वसुली | २५०००/- | १) पाणीशुद्धीकरण | ९८७५/- |
| पाणीपट्टी जमारक्कम | — | २) पा.पु. दुरुस्ती साहित्य | ३६८७९५/- |
| व्याज जमा | ३६०६/- | ३) पाणी टँकर बील | २०५००/- |
| फिक्सेशन डिपॉ. | ३०००/- | | |
| आजचो जमा | ३४६०६/- | खर्च | ५८६९०१/- |
| शु.शि. | ११३१५६१/- | अखेर शिल्लक | ८६०७३१/- |
| एकूण | ९४७६०३/- | एकूण एकंदर | ९४७६०३/- |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेवाडी
ता. भोर जि. पुणे



Scanned with CamScanner

ग्रामपंचायत शिंदेघाळी ता. भोर जि. पुणे

14th वित्त आयोग सन 2019/20

जमाखर्च पत्रक

| जमाबाब | रक्कम | खर्चबाब | रक्कम |
|---|---|---|---|
| अनुदान जमा | १७०५४७४/- | मेडिक्लोर खरेदी | ३३९८४/- |
| | | साफाई लिक्विड सुविधा | ८९००४/- |
| व्याज जमा | ४३०२०/- | TCL खरेदी | ११५१६०/- |
| | | मेडिकल किट | ८००४/- |
| | | आपले सरकार सेवा केंद्र | ८७११८/५४ |
| | | जि. प. शाळा दुरुस्ती | ६०६३०/- |
| | | CCTV कॅमेरे दुरुस्ती | २५०००/- |
| | | गावठाण सुशोभिकरण | ६०,०००/- |
| | | जंतुनाशक फवारणी (कोरोना) | २०९८०/- |
| | | सॅनिटायझर खरेदी | ५०,०००/- |
| | | जंतुनाशक खरेदी | १६२००/- |
| | | कोरोना जनजागृती बोर्ड | ३०००/- |
| | | कोरोना जोखीम कर्मचारी मानधन | ६०००/- |
| जमा | १७४८४९४ | खर्च | ४०२४३७/४६ |
| सुरुवातीची शिल्लक | ४७९८७५/- | अखेर शिल्लक | १८,२५,९३१/५४ |
| एकूण | २२२८३६९/- | एकूण | २२२८३६९/- |

ग्रामसेवक
ग्रामपंचायत शिंदेघाळी
ता. भोर जि. पुणे

वाचा :- 1) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील आदेश क्र जिप/ पंचा/*15/65/2015
दि.09/02/2022

पंचायत समिती कार्यालय भोर
जाक/पंचा 2/वशी/१३८/20 23
भोर दिनांक २०/९/20 २3

आदेश

लेखा परिक्षण अधिकारी, स्थानिक निधी लेखा, पुणे यांचेकडुन संदर्भिय क्र.3 अन्वये प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण अहवालाचे आधारे ग्रामपंचातीने खालील नमुद केलेल्या कालावधीतील लेखापरिक्षण आक्षेपाची पुर्तता पंचायत समितीस सादर केलेली आहे.

ग्रामपंचायतीने सादर केलेल्या अहवालाचे अनुषंगाने पंचायत समितीने खालील नमुद केलेल्या लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपाचे संदर्भात ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण टिपण्णीत दिलेले दोष, त्रुटी व नियमबाहय गोष्टी दुर केल्या बाबत अहवालची छाननी करुन संदर्भ क्र.2 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर आदेशातील खालील रकाना क्र 3 मध्ये नमुद केलेले आक्षेप वगळण्यास मंजुरी देणेत येत आहे.त्याचप्रमाणे रकाना 4 मधिल परिच्छेद (शाक) क्रमांक हे पुर्तता अहवालत नमदु केलेल्या कारणास्तव नामंजुर करण्यात येत आहे.

| ग्रामपंचायत : शिरवली | | पंचायत समिती भोर | जि.पुणे |
|---|---|---|---|
| लेखा परिक्षण अहवाल वर्षे | पंचायत समिती ठराव क्रमांक व दिनांक | मंजुर परिच्छेद (शाक) क्रमांक | नामंजुर परिच्छेद (शाक) क्रमांक |
| २०१५/२०१६ | ठराव क्र. २७<br>दिनांक ८/१२/२२ | १,२,३,५,६,७,८,९, १२,१३,१४,१६,१७,१८, १९,२०,२१,२२,२३ (१९) | ४,१०,११,१५ (४) |
| २०१९/२०२० | ठराव क्र. २७<br>दिनांक ८/१२/२२ | १,२,३,४,६,७,९,१०, ११,१२,१३,१४,१५,१६, १७,१८,१९,२०,२१,२२, २३,२४,२५ (२३) | ५,८, (२) |
| २००२०३ ते ०३०४ | ठराव.क्र. २७<br>दिनांक ८/१२/२२ | १२३४५६९१०११२१३ १४१५१६ (१४) | ७८१७१८ (४) |

गट विकास अधिकारी (वर्ग-1)
पंचायत समिती भोर

प्रति,
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत शिरवली ------- ता.भोर जि.पुणे

2/- नामंजुर परिच्छेदाची (शकांची) पुर्तता करुन आवश्यक त्या कागदपत्रासह परिच्छेद मंजुरीस सादर करावेत.

प्रत- मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पुणे जिल्हा परिषद पुणे यांना माहितीस्तव सादर
प्रत- मा. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा पुणे 1 यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner